ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २० फेब्रुवारी, १९५२ अंक ८

## विविध माहिती

**विमानानें प्रवास करणारे वाढले**— अमेरिकेला जाणाऱ्या प्रवाशांच्या एकण संख्येंत विमानानें गेलेल्यांची संख्या जुलै १९५१ अखेर संपलेल्या फडणिशी वर्षांत अधिक असलेली आढळून आली. त्या वर्षांत एकूण ७,२८,०८९ प्रवासी अमेरिकेंत आले. त्यापैकीं ५८ टक्के विमानानें आले; बाकीचे बोटीनें आले.

**प्राप्तीवरील कराचें उत्पन्न**—भारतीय सरकारच्या १९५१–५२ सालांतील प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नाचा दुरुस्त अंदाज १७० कोटी रुपये करण्यांत आला आहे. डिसेंबर १९५१ अखेरच्या नऊ महिन्यांत १०४ कोटी रुपये जमा झाले. १९५०–५१ सालीं ह्याच कालखंडांत ९८·९० कोटी रुपये जमा झाले होते.

**न्यूयॉर्कमध्यें भारतीय प्रवाशांची सोय**— भारतीय सरकार न्यूयार्कमध्यें एक प्रवास–विषयक कचेरी उघडणार आहे असें समजतें. ही कचेरी भारतीय वकिलातीच्या देखरेखीखालीं काम करणार असून भारतामधून आलेल्या प्रवाशांना होटेल्सच्या सोयी व प्रवासाचा खर्च इत्यादींविषयीं माहिती देईल.

**सुरतेच्या संस्थांची मागणी**—सुरत शहरांतील ५८ निरनिराळ्या संस्थांनीं सुरत शहर हें औद्योगिक शहर म्हणून जाहीर करण्यांत यावें, अशी मागणी केली आहे. सोलापूर व पुणें ह्या शहरांना औद्योगिक शहरें म्हणून ज्या सोयी मिळतात त्या मिळविण्याचा वरील संस्थांचा उद्देश आहे. वरील संस्थांत व्यापारी, औद्योगिक व मजूर संस्था आहेत.

**नारळाचा व्यापार अडचणींत**—गेल्या कांहीं दिवसांत खोबरें आणि खोबऱ्याचें तेल ह्यांच्या किंमती पडल्यामुळें त्रावणकोर–कोचीनमधील नारळाचे बागाइतदार विवंचनेंत पडले आहेत. भारतीय सरकारनें खोबरें व त्याचें तेल ह्या मालावरील आयात–जकात कमी केल्यानें किंमती उतरल्या. नारळाच्या व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळानें भारतीय सरकारकडे आपलें म्हणणें कळविलें आहे.

**केळ्यांच्या सालीपासून कापड**—अननस आणि केळी ह्यांच्या सालीपासून कापड बनविण्याचा एक नवीन प्रकारचा माग एका अमेरिकन यंत्रज्ञानें बनविला आहे असें समजतें. अशा प्रकारच्या सालीपासून एक प्रकारचें सूत बनवून त्याचें कापड वरील मागावर विणण्यांत येईल. तथापि अजून हा प्रयोग पूर्णावस्थेला पोंचलेला नाहीं.

**अमेरिकेची मिऱ्यांची आयात**— न्यूयॉर्कमधील गुदामांत ३१ जानेवारी अखेर ४,४८२ पोतीं काळी मिरी शिल्लक होती. डिसेंबरमधील पोत्यांच्या संख्येपेक्षा ही संख्या १,३२५ पोत्यांनीं अधिक होती. जानेवारींत १४४४ पोत्यांची आयात करण्यांत आली. भारत अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर मिरी पुरवितो.

**भारतांत जपानचें औद्योगिक मंडळ**— १४ जपानी औद्योगिक पुढाऱ्यांचें एक मंडळ भारतांत येण्यासाठीं टोकिओहून ता. १० मार्च रोजीं निघणार आहे. ह्या पुढाऱ्यांत एकूण ११ उद्योगपती व एक्सपोर्ट बँकेचा एक प्रतिनिधी आणि जपानच्या आंतरराष्ट्रीय व्यापार उद्योग खात्याचा एक प्रतिनिधी आहे.

**प्लॅस्टिकचें विमान?**—ब्रिटनमध्यें विमानांना लागणाऱ्या धातूंचा तुटवडा पडल्यामुळें प्लॅस्टिकचा विमानांचा सांगाडा तयार करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. प्लॅस्टिकचें विमान बांधणें अधिक सोपें आहे आणि किंमतीहि ५० ते ८० टक्के स्वस्त असेल, अशी अपेक्षा आहे.

**मच्छीमारीचीं नवीन केंद्रें**—भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें मिळणाऱ्या मदतीमधून मद्रास राज्यांत खोल समुद्रांतील मच्छीमारी करणारीं ३ नवीन केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. त्यापैकीं दोन पश्चिम किनाऱ्यावर आणि चार पूर्व किनाऱ्यांवर असतील. ह्या केंद्रांसाठीं जरूर ती तपासणी व व्यवस्था करण्यांत येत आहे.

**भारतामधील सर्वोदय केंद्रें**—भारतामधील निरनिराळ्या राज्यांत मिळून ८० सर्वोदय केंद्रें आतापर्यंत उघडण्यांत आलीं आहेत. २९ मुंबई राज्यांत, ३९ पंजाबांत, ३ हैद्राबादमध्यें, ४ कच्छमध्यें, ४ राज्यस्थानांत, १ मध्यप्रदेशांत आणि १ त्रिपुरांत, अशी त्यांची वर्गवारी आहे.

**रशिआ–सीलोन व्यापाराची शक्यता**—रंगूनला भरलेल्या एकॅफे परिषदेला सीलोनचे उद्योगमंत्री हजर राहिले होते. ते आतां स्वदेशीं परतले असून त्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं सीलोनचा कच्चा माल घेऊन त्याच्याबद्दल भांडवली माल पुरविण्यास रशिआ तयार आहे.

**पंजाबमधील साखरेचें उत्पादन**—पंजाब आणि पेप्सु राज्यांतील साखरेचें उत्पादन अपेक्षापेक्षा अधिक होईल असें समजतें. ह्या दोन राज्यांत मिळून तीन साखरेचे कारखाने आहेत. त्यांपैकीं दोन कपुर्थळा जिल्ह्यांत आहेत.

## साखरेचें दर एकरीं उत्पन्न कसें वाढेल ?

डॉ. सी. व्हॅन. डिलेविज्न, एफ. ए. ओ. चे ( जागतिक अन्न, शेती, संस्थेचे ऊंस तज्ज्ञ ) कोइमतूर येथें म्हणाले कीं, हिंदुस्थानांत साखरेच्या उत्पन्नाचें प्रमाण उसाच्या लावण्यांत येणाऱ्या जातींच्या अनुरोधानें एकरीं १-५० पासून ३ टन इतकेंच पडतें व हें प्रमाण जगांतील इतर देशांतील साखरेच्या उत्पन्नाशीं तुलना करतां अत्यंत कमी आहे. हवाई व जावा या प्रदेशांत हें प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे एकरीं ८ टन इतकें पडतें. याच्यानंतर पेरू, इजिप्त व दुसऱ्या कित्येक देशांचा नंबर लागतो; सर्वांत शेवटचा नंबर हिंदुस्थानचा आहे. उसाची मूळची उत्पादनक्षमता व सध्यां मिळणारें उत्पन्न यांत फारच अंतर पडलेलें आहे. हें अंतर खालील दोन मार्गांनीं भरून काढतां येईल: (१) उंसाच्या संशोधन क्षेत्रावर सिद्ध झालेल्या प्रयोगांचा ऊंस पिकविणाऱ्यांमध्यें फैलाव करणें, व (२) उसाच्या लागवडीमध्यें सुधारलेल्या पद्धतीचा उपयोग करणें.

वरील संबंधांत डॉ. डिलेविज्न असें म्हणाले कीं, उसाच्या संशोधन क्षेत्रावरून पुष्कळ माहिती जरी बाहेर आलेली असली तरी ती अधून-मधून निरनिराळ्या नियतकालिकांतून, अहवालांतून, विस्कळित अशी प्रसिद्ध होते. याऐवजीं 'शुगर जर्नल' म्हणजे साखरविषयालाच वाहिलेल्या अशा एखाद्या नियतकालिकांत ही माहिती ग्रथित होण्याची हिंदुस्थानांत अत्यंत जरूरी आहे. छोट्याशा फोर्मोसा बेटांत अशीं सहा नियतकालिकें आहेत.

जगांतील मुख्य मुख्य साखर उत्पन्न करणाऱ्या देशांपैकीं फक्त हिंदुस्थानामध्येंच उसाची किंमत वजनावर ठरवून तो साखर करण्याकरितां विकत घेतला जातो. परंतु इतर देशांमध्यें ही पद्धत कित्येक वर्षांपासून बंद झालेली आहे. उसाची किंमत वजनावर ठरविण्याचे हळूहळू बंद करून कांहीं भागांमध्यें तरी उसांतील साखरेच्या प्रमाणावर किंमतीचें मान ठरविण्याचें सुरू करावें, अशी सूचना त्यांनीं केली. तंबाखूप्रमाणेंच साखरेची परिस्थिति आहे; म्हणजे दर एकरीं किती टन ऊंस निघतो एवढेंच पाहून चालणार नाहीं. उसाचा दर्जा व त्यांतील साखरेचा अंश ह्यांचेंहि महत्त्व आहे.

सध्याच्या पद्धतीमुळें उसाच्या उत्पादनास उत्तेजन मिळालें, तरी त्यामुळें दर एकरी साखरेचा उतारा कमी होणें अशक्य नाहीं. २०० पौंड नैट्रोजननें सर्वांत अधिक साखर मिळते, असें कांहीं ठिकाणच्या प्रयोगांवरून दिसून आलें आहे. परंतु ३५० पौंड नैट्रोजन देऊन दर एकरी ऊस जास्त आला तरी २०० पौंड दिलेल्या उसापेक्षां ह्या उसापासून साखर कमी मिळते. म्हणजे, खर्च जादा होतो आणि साखरेचें उत्पादन प्रत्यक्ष घटतेंच. हा राष्ट्रीय नाश थांबविला पाहिजे. उसाचें उत्पादन व दर्जा हीं दोन्हीं वाढलीं, तर अन्नधान्याखालील जमिनी उसाकडे आकर्षिल्या जाण्याचें कारण नाहीं. उलट, उसाखालील जमिनी अन्नधान्याच्या लागवडीसाठी उपलब्ध होतील. हाताशीं असलेल्या ज्ञानाचा व अनुभवाचा अधिकांत अधिक उपयोग करून घेण्याचा हा प्रश्न आहे.

उसाच्या एकरीं उत्पन्नाचे बाबतींत मुंबई राज्य विधानसभेमध्यें प्रश्न विचारण्यांत आला असतां पुढीलप्रमाणें माहिती उघृत करण्यांत आली:-

| प्रदेशाचें नांव | उसाचें एकरीं उत्पन्न टन |
|---|---|
| आसाम | ११·४ |
| बिहार | ९·८ |
| मुंबई | ३१·९ |
| मध्यप्रदेश | १२·६ |
| दिल्ली | ६·३ |
| पूर्व पंजाब | ११·३ |
| मद्रास | २७·७ |
| उत्तर प्रदेश | ११·७ |
| प. बंगाल | १६·१ |
| ओरिसा | २०·९ |

ह्यावरून मुंबई राज्यामध्यें उसाचें एकरीं उत्पन्न सर्वांत जास्त आहे असें दिसून येईल.

**एअर इंडिआ विमान कंपनीला कर्ज**—सुप्रसिद्ध एअर इंडिआ ह्या विमान कंपनीला ५० लाख रुपये कर्ज देण्याचें भारतीय सरकारच्या दळणवळण खात्यानें ठरविलें आहे. कंपनी सुपर-कॉन्स्टेलेशन जातीचीं दोन विमानें २ कोटी रुपयांना घेणार आहे.


# NOTICE

**THE BHARAT INDUSTRIAL BANK, Ltd., POONA.**

Notice is hereby given that the 14th Ordinary General Meeting of the Share-holders of the Bharat Industrial Bank, Ltd., Poona, will be held on Sunday, the 9th March 1952, at the Registered Office of the Bank, 15, Shukrawar Peth, Poona, at 4-30 P. M. to transact the following business.

1. To receive and consider the Report of the Directors, Audited balance sheet and Profit and Loss Account for the period ending 31st December 1951.

*2. To declare a dividend.

3. To elect the Directors in places of the retiring Directors, who are eligible for re-election.

4. To appoint Auditors and fix up their remuneration.

5. To transact such other business as may be allowed by the Chairman.

By order of the Board,
**N. N. Kshirsagar.**
**R. B. Salvekar.**
Managing Directors.

Poona, 12 Feb. 1952
15, Shukrawar Peth, Poona 2.

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from 3rd March 1952 to 16th March 1952, both days inclusive.

*** The dividend when sanctioned will be payable on and after 24th April 1952. The dividend warrants will be posted to the registered addresses of the Share-holders.**

# अर्थ

बुधवार, ता. २० फेब्रुवारी, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्री. वैकुंठराय मेहतांचें ऋण

### उच्च गुण संपत्तीस दीर्घोद्योगाची व कार्यक्षमतेची जोड

श्री. वैकुंठराय मेहता ह्यांची फायनॅन्स कमिशनवर नेमणूक झाली असून त्यांचें ह्यापुढील कार्यक्षेत्र अखिल भारतीय स्वरूपाचें होणार आहे. १९४६ सालापासून ते मुंबई प्रांताचे अर्थमंत्रि होते आणि कोणासहि न दुखवतां व आपला योग्य मुद्दा न सोडतां कार्यक्षमतेनें त्यांनीं आपलें हें काम केलें. सहकारी खातेंहि त्यांचेकडे होतें, त्यामुळें सहकारी चळवळीच्या वाढीस उत्कृष्ट प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळालें. त्यापूर्वीची त्यांची सहकारी व ग्रामोद्योग क्षेत्रांतील कामगिरी तर अतुलनीय झाली. सहकारी चळवळीच्या गेल्या ४० वर्षांतील प्रगतीच्या क्षेत्रांतील श्री. वैकुंठराय ह्यांचा वांटा किती भरदार आहे, ह्याबद्दल दुमत होणें अशक्य आहे. ते जर सहकारी चळवळीस लाभले नसते, तर इतर क्षेत्रांतहि त्यांनीं अशीच मोठी कामगिरी केली असती. पण सहकाराच्या बाबतींत मुंबई राज्याला मात्र अभिमानानें तोंड दाखविणें अशक्य झालें असतें. ह्या प्रसंगानें, श्री. वैकुंठरायांचे पूज्य वडील कै. सर लल्लुभाई ह्यांची आठवण झाल्याविना रहात नाहीं. त्यांच्या प्रेरणेंत व स्वदेशहितबुद्धींत श्री. वैकुंठरायांच्या कामगिरीचा उगम आहे.

विशिष्ट जागा विभूषिणें व मानसन्मान मिळविणें, ह्यावरूनच कार्याचें मोजमाप करण्याच्या सध्यांच्या काळांत श्री. वैकुंठराय ह्यांच्या आजच्या श्रेष्ठ स्थानामागील अखंड तपश्चर्येची कल्पनाहि करणें अशक्य होईल. श्री. वैकुंठराय ह्यांनीं दुबळ्या व निकृष्ट जीवनाच्या खेडुतांसाठीं अहर्निश व अत्युच्च दर्जाचें काम केलें आहे, व त्यासाठीं कोणतीहि गैरसोय आड येऊं दिलेली नाहीं.

श्री. वैकुंठराय व "अर्था"चे संस्थापक ह्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता, व त्यामुळें प्रस्तुत संपादकालाहि त्यांच्या निकट साहचर्याचा दीर्घ काळ लाभ झालेला आहे. "अर्था"स त्यांचें अतिशयें मोठें साहाय्य नेहमीच होत आलें आहे. लेखनासाठी पत्रानें विनंति केली, तर 'सोबत लेख जोडला आहे' असेंच तात्काळ उत्तर येई. त्यांचा अभ्यास, निरलसपणा, सद्भावना, साधेपणा, दीर्घोद्योग, कार्यक्षमता, नम्रता, मिडस्तपणा, निःस्वार्थीपणा, ह्यांचा संसर्ग परिचितांना सदैव हितकारक व कल्याणप्रद झालेला आहे. त्यांचें सार्वजनिक जीवन व खासगी जीवन ह्यांत कांहींहि तफावत आढळणार नाहीं, आणि त्यांच्या सहृदयतेमुळें तत्त्वास किंवा निर्णयास बाध येणार नाहीं. श्री. वैकुंठराय ह्यांच्यामध्यें सात्त्विक वृत्ति व व्यवहारकुशलता ह्यांचा संगम उत्कृष्ट झालेला आहे.

श्री. वैकुंठरायांच्या विद्वत्तेचा व दूरदृष्टीचा समाजास फार मोठा उपयोग झाला आहे व होत आहे; त्यांचें अनुकरण पुढाऱ्यांनीं व कार्यकर्त्यांनीं अगत्य करण्याजोगें आहे. त्यांच्या थोर कामगिरीबद्दल "अर्था"च्या वाचकांसाठीं आपले विचार मांडण्याची विनंति प्रा. धनंजयराव गाडगीळ व माजी सहकारी रजिस्ट्रार श्री. वि. शि. भिडे, आय. सी. एस. (रि.) ह्यांना केली असतां, ती दोघांनींहि अर्ध्या क्षणांत मान्य केली, ह्यावरून श्री. वैकुंठरायांबद्दल श्रेष्ठ आदर इतर उच्च ठिकाणींहि कसा वसत आहे, हें स्पष्ट होईल. आम्हीं ह्या दोघांचेंहि त्यांच्या उद्बोधक लेखांबद्दल अत्यंत आभारी आहों.

---

## हिंदच्या तंबाखूच्या निर्गतीची जास्त प्रमाणांत शक्यता

चालू वर्षी विशेषतः अतिपूर्वेकडील देशांत हिंदच्या तंबाखूची जास्त प्रमाणांत निर्गत होण्याची शक्यता दिसत आहे. कारण महाग अमेरिकन तंबाखूपेक्षां स्वस्त दराचा हिंदचा तंबाखू जपानमध्यें जास्त लोकप्रिय बनत आहे. अलिकडे जाणवणाऱ्या डॉलर टंचाईचा हा प्रभाव किंवा परिणाम समजला पाहिजे. अजूनपर्यंत उंची जपानी सिगरेटमध्यें हिंदी तंबाखू वापरला जात नसे, परंतु अलिकडे तो १० टक्के या प्रमाणांत वापरला जातो. अजूनपर्यंत हिंदच्या तंबाखूची निर्गत विशेषतः ब्रिटन, युरोपांतील कांहीं देश, पाकिस्तान व एडन यांकडे होत असे. परंतु अलिकडे जगभर निर्माण झालेल्या डॉलर टंचाईमुळें हिंदी तंबाखूचा खप जास्त प्रमाणांत जपानसारख्या देशांत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जपानप्रमाणेंच चीनमध्येंहि हाँगकाँगच्या मार्गानें हिंदचा स्वस्त तंबाखू खपूं शकेल असें गेल्या सहा महिन्यांतील वृत्तांतावरून दिसत आहे. ऑस्ट्रेलियांत तंबाखूचें उत्पादन वाढत आहे, परंतु तेथेंहि हिंदच्या स्वस्त तंबाखूला मागणी आहे, असें ऐकिवांत आहे. हिंदचा परराष्ट्रीय व्यापार मजबूत करण्याच्या दृष्टीनें तंबाखूची निर्गत जास्त प्रमाणांत झाल्यास ती गोष्ट आजच्या आर्थिक अडचणीच्या काळांत इष्टच समजली पाहिजे.

---

## तागाच्या गिरण्यांचें भवितव्य

हिंदच्या आयात व निर्यात व्यापार नियंत्रणाचे अधिकारी श्री. एल्. के. झा यांनीं नुकतीच डंडी येथील तागाच्या कारखान्यांना भेट दिली. उत्तर अमेरिकेंत अलिकडे तागाच्या ऐवजीं बदली माल वापरण्याची प्रवृत्ति दिसून येते हें एक चिंतेचें कारण आहे. या विषयावर डंडी येथील कारखानदारांशीं त्यांनीं चर्चा केली. पाकिस्तानमध्यें मात्र अजिबात नवीन तागाचे कारखाने उघडण्यांत येणार आहेत. हिंदी तागाच्या गिरण्यांतील यंत्रसामुग्री बदलण्याचा प्रश्न हा प्रत्येक गिरणी मालकावर व्यक्तिशः अवलंबून असल्यामुळें कठीण आहे. एकदां एका मालकानें यंत्रसामुग्री बदलण्याचें ठरविलें म्हणजे त्याचा परिणाम सर्व दृष्टींनीं काय होईल याचा सरकारला विचार करावा लागेल, व या बाबतींत परदेशच्या हुंडणावळीचा प्रश्नहि महत्त्वाचा आहे. कलकत्त्यांत पुष्कळसे मजूर तागाच्या गिरण्यांत काम करणारे असतात. या दृष्टीनें श्रम वांचविणारी यंत्रसामुग्री उपयोगांत आणावयाची तर त्यासाठीं कांहीं मजुरांना बेकार रहावें लागेल ही गोष्टहि विचारांत घेतली पाहिजे.

## वैकुंठरायांची सर्व-संग्राहक व प्रभावी कार्यक्षमता

### बिकट व प्रतिकूल परिस्थितींतील उच्च दर्जाची सेवा

[ लेखकः—श्री. विठ्ठल शिवराम भिडे, बी. ए., एलएल. बी. (कँटब)., सेवानिवृत्त आय. सी. एस. ]

माझ्या माहितीप्रमाणें, नामदार श्री. वैकुंठराय मेहता यांच्या सहकारी चळवळींतील कार्याला १९१४-१५ सालापासून चिरस्थायी स्वरूपांत प्रारंभ झाला. त्यावर्षी हिंदुस्थान सरकारनें सहकाराच्या क्षेत्रांत तत्पावेतों झालेल्या कार्याचा आढावा घेऊन शिफारशी करण्यासाठीं सर एडवर्ड मॅक्लॅगन यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली. त्यावेळीं मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीचे एक प्रमुख आधारस्तंभ, श्री वैकुंठराय यांचे मान्यवर वडील कै. लल्लुभाई सामळदास ( त्यावेळचे सर लल्लुभाई सामळदास ) हे होते व त्यांची या कमिटीवर मेंबर म्हणून नेमणूक झाली. आपल्या वडिलांचे नदतनीस म्हणून या कमिटीबरोबर श्री. वैकुंठराय यांना सर्व हिंदुस्थानभर फिरून निरनिराळया प्रांतांतील सहकारी चळवळींचें तत्कालीन यथार्थ स्वरूप अगदी जवळून पहाण्याची संधि मिळाली व या विषयावरील आजच्या त्यांच्या अथांग ज्ञानाचा व अनुभवाचा पाया अशा रीतीनें घातला गेला. कमिटीच्या रिपोर्टानुसार चळवळीला भांडवलाचा पुरवठा करण्याकरतां खेडेगांवच्या छोट्याशा पतपेढीपासून प्रांताच्या मुख्य शहरीं असणाऱ्या केंद्रीय सहकारी बँकेपर्यंत पेढ्यांची एक श्रेणी क्रमाक्रमानें अस्तित्वांत आली. मुंबईच्या केंद्रीय बँकेंत श्री. वैकुंठराय यांचा ऑनररी मॅनेजर म्हणून १९१२ मध्येंच प्रवेश झाला होता, व १९२७ च्या आगस्टमध्यें जेव्हां माझी मुंबई प्रांतांत रजिस्ट्रार म्हणून नेमणूक झाली त्यावेळीं वैकुंठराय प्रांतिक सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून आपल्या कुशल कारभारामुळें सर्व बाजूंनीं आदर व प्रेम संपादन करीत होते.

१९२७ ते १९३१ पर्यंत मी रजिस्ट्रार होतों व सहकारी चळवळीच्या स्थिरतेच्या व अपेक्षित प्रगतीच्या दृष्टीनें हीं चार व नंतरचींहि आणखी कांहीं वर्षें अतिशय कष्टाचीं आणि निराशेचीं गेलीं.

मुंबईच्या केंद्रीय बँकेपुढें तर यावेळीं अनेक समस्या येऊन पडल्या होत्या. बारामती व बेलापूर या प्रमुख गूळ उत्पादन क्षेत्रांत प्रांतिक बँकेचे लक्षावधी रुपये सोसायट्यांकडे थकबाकी म्हणून अडकून पडले होते. १९१४-१८ चें महायुद्ध संपल्यानंतर गुळाचे भाव एकदम घसरले व जुनीं कर्जें वसूल होण्याचा मार्ग दिसेना. तशांतच लोकांचे व्यवसाय अजिबातच बंद पडूं नयेत म्हणून दरवर्षी नवीं कर्जेंहि द्यावीं लागत. सोसायट्या बरखास्त करणें व कर्जदारांच्या उसाखालील जमिनी विक्रीला काढणें यापासूनहि तादृश उपयोग होण्यासारखा नव्हता. अशा बिकट परिस्थितींत शहरांतील ठेवीदारांचे पैसे सुरक्षित राखून व वेळचे वेळीं त्यांना व्याज देऊन त्यांचा विश्वास संपादन करणें व खेडुतालाहि त्याच्या उत्पादनाच्या कार्यांत जरूर ती वक्तशीर मदत करून संभाळून घेणें या गोष्टी तारेवरच्या कसरतीसारख्या होत्या. मी महिन्यांतून बहुतेक एकदां बँकेच्या बोर्डाच्या सभेस हजर रहात असे. साहजिकपणेंच अशा वेळीं संचालक मंडळींच्या विचारावर एक प्रकारचें नैराश्याचीच छटा पसरे व खेडुतांच्या परिस्थितीसंबंधीं त्यांच्या बाजूनें म्हणून चार सहानुभूतिपूर्वक शब्द बोलण्याचीं मजवर मधूनमधून जबाबदारी येई. "नाप्पृष्टः कस्यचित् ब्रूयात्" हा सनातन दंडक वैकुंठराय बोर्डाच्या सभांच्या वेळीं कटाक्षानें पाळीत पण जरूर तितकेंच व अगदी मोजक्या शब्दांत जें निवेदन ते करीत तें इतकें समर्पक व समतोल असे, कीं घवरांटीची छटा लवकरच नाहींशी होऊन प्रत्येक प्रकरणावर विशेष कालक्षेप न होतां अगदीं योग्य तोच निर्णय घेतला जाई. वैकुंठरायांच्या सर्वसंग्राहक व प्रभावी कार्यक्षमतेचें यथार्थ दर्शन या बोर्डाच्या सभांच्या रूपानें मला वरचेवर घडण्याचा योग येत असे.

केंद्रीय बँकेचीं सूत्रें वैकुंठराय यांचे हातीं असतांना बँकेनें सुरू केलेल्या कांहीं वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा उल्लेख करावासा वाटतो. पंचमहाल जिल्ह्यांतील दाहोद कालोल भागांतील आदिवासींना शेतीकरतां दरवर्षी प्रत्यक्ष बीबियाणें इत्यादींच्या रूपानें कर्ज द्यावयाचें व पीक हातांत आल्यावर सहकारी खात्यानें पसंत केलेल्या ठराविक अडत दुकानामार्फत त्यांच्या मालाची विक्री करून कर्जवसुलीनंतर राहिलेले पैसे खातेदाराच्या नांवावर शिल्लक म्हणून ठेवून द्यावयाचे. या कामाकरतां बँकेनें श्री. बाबुभाई देसाई या नांवाचे एक कार्यकुशल अधिकारी सरकारी नोकरींमधून मागून घेतले होते. अशा प्रकारें योग्य नियंत्रणाखालीं आदिवासींच्या हितासाठीं अडत दुकान चालविण्याचा हा प्रयोग पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें यशस्वी ठरला आहे. बँकेच्या नेहमींच्या कामकाजाकरतां योग्य इसम निवडून त्यांची नेमणूक, वेतनश्रेणी, रजा, शिक्षा, बढती, वगैरे बद्दलचे नियम काळजीपूर्वक तयार केलेले असत व त्यांच्या अंमलबजावणींबद्दल कधीं तक्रार येत नसे. इतर बँकांबरोबर नोकरवर्गाच्या लायकी वगैरे बाबतींत मला जी हुज्जत घालावी लागे, तसा प्रसंग केंद्रीय बँकेच्या बाबतींत कधींहि आला नाहीं. त्याचप्रमाणें बँकेचा प्रत्यक्ष कारभार यथातथाच असला तरी बँकेकरतां एखादी भली मोठी इमारत बांधून आपलें स्वतःचें अगाऊच स्मारक करून ठेवण्याची प्रवृत्तिहि अनेक ठिकाणच्या चालक वर्गांत त्यावेळीं दिसून येई. या बाबतींत वैकुंठराय यांनीं घालून दिलेल्या धुळें येथील बँकेच्या छोटेखानी, सोइस्कर इमारतीचें उदाहरण नमुनेदार होतें व तें मी पुढें कित्येक वर्षेपर्यंत लोकांच्या निदर्शनास आणीत होतों. जमीन गहाण बँकेचाहि नवा प्रयोग १९२९ च्या सुमारास झाला व भडोच, धारवाड आणि खानदेशांत पाचोरा या तीन ठिकाणीं जमीन गहाण बँका प्रत्यक्ष स्थापन झाल्या. या बाबतींत वैकुंठरायांचा प्रभावी पाठिंबा नसता तर हा प्रस्ताव त्यावेळीं होऊं शकला नसता; कारण जागतिक मंदीच्या काळांत जमीन गहाणासारख्या भानगडीच्या व तापदायक क्षेत्रांत पाऊल टाकण्यास केंद्रीय बँकेच्या बोर्डाची बरीच नाखुषी होती. वैकुंठरायांच्या प्रेरणेनें प्रांतिक बँकेनें सुरू केलेल्या नवीन प्रथांची व प्रयोगांची यादी पुष्कळच मोठी आहे, पण कांहीं ठळक गोष्टीच मी येथें निदर्शित केल्या आहेत.

खुद्द व्यक्तिशः वैकुंठरायांचें मजवरचें ऋण फार मोठें आहे. १९२७-३१ हा काल सरकारी जमाखर्चाच्या दृष्टीनें फार जिकिरीचा होता. कोणाहि खातेप्रमुखाला एखादी भव्य, डोळ्यांत भरण्यासारखी योजना पुरी करून नांव मिळविणें अशक्यच होतें. सर्वसाधारण लोकमतहि उदासीनच. सहकारी चळवळीमुळें शक्य झालेल्या अनेक उपयुक्त योजना व फायदे कांहीं संस्था व व्यक्तींच्या ठिकाणीं निःसंशय दृष्टीस पडत पण त्याकडे दुर्लक्ष होऊन सालोसालीं फुगत जाणाऱ्या थकबाक्या व ठिकठिकाणीं

( पृष्ठ ६२ वर पुढें चालू. )



## वैकुंठभाई, महत्कार्यासाठी पुनः नेतृत्व पत्करा

[ लेखकः—प्रा. धनंजयराव गाडगीळ, एम. ए., एम. लिट. ]

श्री. वैकुंठ लल्लुभाई मेहता हे या महिन्यांत मुंबई राज्यांतील अर्थ व सहकार या खात्यांच्या मंत्रिपदावरून निवृत्त होऊन फायनॅन्स कमिशनवरील सदस्यत्वाचा स्वीकार करीत आहेत व यामुळें श्री. वैकुंठभाई यांचा मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीशीं असलेला जवळ जवळ चाळीस वर्षांचा संबंध तात्पुरता तरी तुटणार आहे. श्री. वैकुंठभाई यांच्या आजवरच्या सार्वजनिक आयुष्यांत मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीची उपासना व मार्गदर्शन हींच प्रमुख कार्यें गणलीं पाहिजेत. इतर अनेक क्षेत्रांत त्यांनीं काम केलें व स्वतःच्या पद्धतीनें, आपली छाप पाडली. ग्रामोद्योग हा त्यांचा विशेष आवडीचा विषय, परंतु त्याबद्दलची त्यांची असलेली कळकळ व निष्ठा यांच्या मानानें या क्षेत्रांत भरघोस काम करण्यास त्यांस कधींच सवड मिळाली नाहीं. मुंबईतील सोशल सर्व्हिस लीगशीं त्यांचा फार दिवसांचा घनिष्ट संबंध आहे. व कापड गिरणी मजूर समितीचे सदस्य म्हणून मजूर वर्गाच्या सुधारणेबाबतचा कार्यक्रम आंखण्यांत त्यांचा प्रमुख भाग होता. अलीकडे मुंबई राज्यांतील अर्थमंत्रि म्हणूनच त्यांस सर्व ओळखीत असत. या जागींहि त्यांनीं असामान्य लौकिक मिळविला. गाजावाजा न करतां कारभाराची घडी व्यवस्थित व पायाशुद्ध घालणें हें तर श्री. वैकुंठभाईंस प्रत्येक क्षेत्रांतच साधतें; कदाचित इतर कांहीं जणांसहि तें साधेल. परंतु अर्थमंत्रि असूनहि आपले सहकारी मंत्रि व विधिमंडळांतील सर्व पक्षांचे सदस्य यांचा प्रेमादर, कारभार चोख राखून, मिळविणें यास लागणारी कर्तबगारी खरोखर असामान्य समजली पाहिजे. हें झालें तरी श्री. वैकुंठभाई यांचें आजपर्यंतचें प्रमुख सार्वजनिक कार्यक्षेत्र सहकारी चळवळ हेंच होतें हें कोणीहि कबूल करील.

हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीची उभारणी व आजवरची प्रगति ही श्री. वैकुंठभाईनीं समग्र जवळून पाहिली आहे. त्यांचें वडील सर लल्लुभाई सामळदास मेहता मॅकलॅगन कमिटीचे सदस्य होते. त्यांच्याबरोबर हिंडतांना व त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतांना आलेले अनुभव श्री. वैकुंठभाई अनेकदां सांगतात. याच सुमारास त्यांचा मुंबई प्रांतिक सहकारी बँकेशीं संबंध जुळला व त्यांनीं आपलें मुख्य कार्य या बँकेचे धुरीण म्हणूनच केलें. मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांचा विकास इतर प्रांतांतील बँकांपेक्षां कांहींशा निराळ्या पद्धतीवर झाला आहे. येथील प्रांतिक बँक केवळ जिल्हा बँकांची मध्यवर्ती बँक म्हणून काम करीत नाहीं. सुरवातीस अनेक जिल्ह्यांत व भागांत जिल्हा सहकारी बँका निघाल्या नाहींत व कांहीं निघाल्यानंतर डबघाईस आल्या; यामुळें प्रांतिक बँकेस अनेक जिल्ह्यांत जिल्हा बँकेचें काम पत्करावें लागलें व प्रांतिक बँक असूनही प्राथमिक सहकारी सोसायटींशीं प्रत्यक्ष व्यवहार करावा लागला. सर्व प्रांताकरितां प्रांतिक बँक व कांहीं जिल्ह्यांत शिवाय जिल्हा बँक असें दुहेरी कार्य मुंबई प्रांतिक बँक करीत आली आहे. याबरोबरच सहकारी बँकेनें केवळ सोसायट्यांशींच व्यवहार न करितां व्यक्तिगत व्यवहार करून खाजगी व्यापारी व उत्पादक यांसही आपला पैसा पुरविण्याचा पायंडा या प्रांतांत प्रथमपासून पडला. असला व्यवहार तात्त्विकदृष्ट्या बरोबर नाहीं असा त्यावर आक्षेप येतो; सहकारी चळवळींत लागणारा पैसा इतरत्र यामुळें वळविला गेला तर आक्षेप व्यावहारिकदृष्ट्याहि बरोबर ठरेल. परंतु सहकारी मंडळ्या थोड्या व विखुरलेल्या व त्यांचा कारभार संकुचित असतांना या क्षेत्राबाहेर कार्यच करावयाचें नाहीं असें पथ्य बाळगूं गेल्यास जिल्हा बँकांच्या व प्रांतिक बँकांच्याही एकंदर व्यवहाराचें प्रमाण अल्प राहिलें असतें; व हा अल्प व्यवहार तोट्याचा ठरून इतर प्रांतांप्रमाणें जिल्हा बँका दुर्बळ व निरनिराळ्या अर्थव्यवहारांत अननुभवी राहिल्या असत्या. मुंबई प्रांतांतील सहकारी प्रांतिक बँक व जिल्हा बँका यांचें सामर्थ्य, धडाडी व कर्तृत्व हीं अखिल भारतांत उत्कटतेनें डोळ्यांत भरतात. या सर्व घटनेचें मुख्य श्रेय कोणा एका व्यक्तीस द्यावयाचें असल्यास तें श्री. वैकुंठभाई यांसच दिलें पाहिजे.

मुंबई राज्यांतील सहकारी बँकांच्या कार्यपद्धतींतील कोणतीही विशिष्ट बाब घेतली तर तिचा इतिहास व सद्यःस्थिति याविषयीं श्री. वैकुंठभाई मार्मिक विवेचन करूं शकतील इतकें या कारभाराशीं त्यांचें सततचें निकट साहचर्य आहे व इतका सखोल व तपशीलवार अभ्यास त्यांनीं समग्र चळवळीचा केलेला आहे. प्रत्येक ठिकाणच्या व्यवहाराची प्रत्यक्ष माहिती असावी हा कटाक्ष त्यांनीं प्रथमपासून बाळगला; यामुळें सहकारी कार्यपद्धतीच नव्हे तर स्थानिक परिस्थिति व स्थानिक कार्यकर्ते यांची श्री. वैकुंठभाई यांस इत्थंभूत माहिती आहे. कार्यतत्परता व निरलसता यांमुळें श्री. वैकुंठभाई यांस प्रत्येक तपशील अवगत झाला, तर कुशाग्रबुद्धि व शुद्ध तात्त्विक बैठक यांमुळें त्यांस प्रत्येक प्रश्नाचें खरें स्वरूप समजूं शकलें. या सर्वांस अनाग्रही स्वभाव व विनम्र वागणूक यांची जोड मिळाल्यामुळें कोणासही भासूं न देतां अनेक वर्षें श्री. वैकुंठभाई यांजकडे या राज्यांतील सहकारी चळवळीचें बिगर-सरकारी धुरीणत्व प्रत्यक्षानें राहिलें व ही गोष्ट या चळवळीस फार फलदायी ठरली. पुढें ओघानें सहकारी चळवळीच्या नेतृत्वपदाचा सरकारी अधिकारही त्यांजकडे आला. हा अधिकार त्यांचेकडे आल्यानंतर व त्याचे आधीं कांहीं वर्षें महायुद्धकालीन परिस्थितीमुळें सहकारी कारभारांत मोठ्या घडामोडी झाल्या व बरीच प्रगति दिसून आली. पण ही सर्व प्रगति, अत्यंत बिकट व निरुत्साहजनक परिस्थितींत चिकाटीनें व ढोलसपणानें श्री. वैकुंठभाई व त्यांचे कै. प्रा. वामनरावजी काळे यांसारखे सहकारी यांनीं जें कार्य अनेक वर्षें केलें त्याचेंच खरें फळ आहे, हें लक्षांत बाळगणें जरूर आहे.

श्री. वैकुंठभाई यांच्या मंत्रिपदाच्या काळांत या राज्यांत सहकारी चळवळीच्या स्वरूपांत महत्त्वाचें स्थित्यंतर घडलें यांत आश्चर्य नाहीं. सहकारी चळवळीची प्रगति नियोजनपूर्वक केली पाहिजे हा विचार श्री. वैकुंठभाई यांनींच अनेक वर्षांपूर्वी विस्तारानें पुढें मांडला. तेव्हां, सरकारी समित्यांनीं, या नियोजित प्रगतीचें स्वरूप रेखाटल्यानंतर इतर कोणत्याही राज्याचे आधीं

मुंबई राज्यांत प्रत्यक्ष नियोजन करून पुढें पाऊल टाकावें हें साहजिक घडलें. या सर्वांचें मुख्य श्रेय श्री. वैकुंठभाईंकडेच जातें. कारण, नियोजित प्रगति करण्यास लागणारी अनुकूल परिस्थिति मुख्यतः त्यांनींच या राज्यांत निर्मिली, आणि नंतर सरकारी समित्यांनीं केलेल्या शिफारशींची प्रत्यक्ष अंमलबजावणी केवळ तेच सहकारी मंत्रि होते म्हणून झाली. हा सर्व इतिहास पाहतां श्री. वैकुंठभाईंच्या निवृत्तीमुळें या राज्यांतील प्रत्येक सहकारी कार्यकर्त्यास आपला एक सततचा आधार आपणास सोडून जात आहे, असें वाटत असल्यास आश्चर्य नाहीं, पण हीही घटना तात्कालिक आहे असें मी मानतों. त्यांनीं स्वीकारलेली नवीन जागा एका विशिष्ट प्रश्नाचा उलगडा करण्यास नेमलेल्या मंडळा-वरील आहे. या मंडळाचें काम १–२ वर्षांपलीकडे चालणार नाहीं. उलट, सहकारी अर्थव्यवहाराचें क्षेत्र दिवसेंदिवस जास्त व्यापक, जास्त गुंतागुंतीचें व जास्त जबाबदारीचें होणार. आपली सर्वच अर्थव्यवस्था सहकारी करावी व शक्य तितक्या त्वरेनें हल्लींच्या व्यवस्थेचें सहकारी व्यवस्थेंत स्थित्यंतर करावें या विचारास फारच जोराचा पाठिंबा मिळत आहे. हें महत्कार्य करा-वयाचें तर त्यास विचारी, अनुभवी व कार्यकुशल नेता हवा; असा नेता अखिल भारतांत श्री वैकुंठभाईंशिवाय दुसरा कोणीच नाहीं. म्हणून श्री. वैकुंठभाई व सहकारी कारभार यांतील आजची ताटातूट केवळ तात्पुरती आहे असें मानून पुन्हां नवीन जोमानें, बदलत्या परिस्थितींत, जास्त व्यापक भूमिकेवरून श्री. वैकुंठभाई सहकारी चळवळीचें मार्गदर्शन करूं लागतील अशी आशा प्रगट करून हा छोटा लेख संपवितों.

---

( पृष्ठ ६० वरून पुढें चालू )

## वैकुंठरायांची सर्व-संग्राहक व प्रभावी कार्यक्षमता

आपमतलबी व्यक्तींनें केलेले गैरचाळे याकडे मात्र बोट दाखवून सहकारी चळवळीची हेटाळणी करण्याकडेच साधारण प्रवृत्ति दिसून येई. अशा स्थितींत स्वीकृत कार्यावरील निष्ठा व आत्म-विश्वास शाबूत ठेवणें दिवसेंदिवस कठीण होत होतें. त्यांतच १९३०–३१ च्या सुमारास खेड्यांतील प्राथमिक सोसायट्यांची स्थिति अगदीं हलाखीची असतांहि ऑडिट फीबाबत ग्रामीण सोसायट्यांवर बराच मोठा बोजा लादण्याचा सरकारी निर्णय झाला. कै. गोविंदराव प्रधान सहकारी मंत्री होते. तोंपर्यंत त्यांच्या साहाय्यानें पूर्वीं अनेक गोष्टींत जी चिकाटी मी दाखवूं शकलों होतो, तसा नेट धरणें यावेळीं अशक्य झालें. बोर्डाच्या सभेकरतां मी मुंबईस गेलों म्हणजे कांहीं काळ वैकुंठ-राय यांच्या बरोबर त्या त्या वेळच्या परिस्थितीविषयीं खुल्या मानानें चर्चा करणें हा मला मोठाच विरंगुळा होता व अशा विचारविनिमयानंतर घटत चाललेल्या आत्मविश्वासांत बरीच भर पडत असे. बँकेच्या बाजूनेंहि त्यावेळीं वैकुंठराय यांना आपलें काम बरेंच तापदायक होत असावें असा माझा तर्क आहे. बँकेच्या चालकवर्गापैकीं व एकंदर सहकारी चळवळींत भाग घेणाऱ्यांमध्यें बऱ्याच प्रमुख मंडळींचें काँग्रेस प्रेम उघड दिसत असे. यामुळें त्यांच्या कर्तृत्वाबद्दल व निस्पृहतेबद्दल बिलकुल संदेह नसला तरी चळवळींत उपस्थित होणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नावर त्याकाळच्या वरिष्ठ सरकारी गोटांत त्यांची मतें प्रभावी होऊं शकत नसत. अशा रीतीनें कांहींशा वैफल्याच्या व निरुत्साहाच्या वातावरणांत मी अधिकारी या नात्यानें, व वैकुंठरायांनीं बिनसरकारी कार्यकर्त्यांपैकीं एक प्रमुख म्हणून बरींच वर्षें सहकारी चळवळींत एकत्र काढलीं आहेत आणि अशा कार्यांत येणाऱ्या छोट्या–मोठ्या, भल्या–बुऱ्या अनुभवांचा पूर्ण स्वाद घेतला आहे. सहकारासारख्या मर्यादित क्षेत्रांतून निघून वैकुंठरायांनीं पुढें क्रमानें मुंबई राज्याचें अर्थमंत्रीपद विभूषित केलें व त्यानंतरहि एका अतिशय महत्त्वाच्या आर्थिक कमिटीवर त्यांची नेमणूक होत आहे. तथापि २० वर्षें होऊन गेल्यामुळें जवळजवळ इतिहासजमा झालेल्या आमच्या दोघांच्या साहचर्याची अजूनहि ते जाणीव ठेवतात व उत्तेजनाचे चार शब्द बोलतात. हा त्यांचा मोठेपणा व आमचें भाग्य आहे. आज-मितीला सहकारी चळवळीचा पसारा फारच मोठा म्हणजे छाती दडपून जाण्याइतका झाला आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभा-पासून म्हणजे गेल्या १०।१२ वर्षांतील अनेक आगंतुक कारणांनीं फुगलेली ग्राहक व हौसिंग सोसायट्यांची वाढ तर थोडी भीतीच उत्पन्न करते. पण आतांचे दिवस निराळे आहेत. खुद्द वैकुंठरायच सहकार या विषयाचे मंत्री आहेत व त्यांच्या कारकीर्दींत प्रसृत झालेल्या अनेक योजना पायाशुद्ध तंत्रावरच आधारिलेल्या अस-णार याबद्दल निश्चिति वाटते. वैकुंठराय आतां लवकरच राज-कारणासारख्या धकाधकीच्या मामल्यापासून थोडेसें बाजूस सरत असले तरी यापुढेंहि त्यांचें उज्ज्वल चारित्र्य, अनुभव व ज्ञान यांचे जनहितासाठी राबतां करून घेण्याचे अनेक पर्याय निघतील हें निश्चित आहे.

आज त्यांच्या आगामी राजकारण निवृत्तीच्या प्रसंगानें माझ्यासारख्या त्यांच्याबरोबर जुन्या काळीं एकाच कार्यक्षेत्रांत वावरलेल्या मनुष्याला वैकुंठरायासंबंधीच्या पूर्वीच्या आठवणींना थोडासा उजाळा देण्याची व त्यांच्या संबंधीं मनांत वसत अस-लेली आदर–भावना व्यक्त करण्याची संधि दिल्याबद्दल मी श्री. श्रीपादराव काळे यांचा अत्यंत ऋणी आहें.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. ( स्थापना १९१८ )
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ वेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

---

### सिनेमाच्या धंद्यावर संकट

भारतीय चित्रपटांच्या आयातीवर बंधनें घातल्यामुळें प. पाकिस्तानमधील चित्रपटगृहें अडचणीच्या परिस्थितींत सांपडलीं आहेत. प. पाकिस्तान सरकार इतर करांबरोबर भारतीय बोलपटांच्या प्रत्येक फुटामागें १ रुपया आयात कर घेतें. प. पाकिस्तानांत २५० सिनेमागृहें आहेत आणि त्यांना १०० बोलपटांची जरूरी असते. त्यापैकीं ९० बोलपट तरी भारतामधून आयात करावे लागतात. पाकिस्तानांत दरवर्षी सरासरी ८ ते १० बोलपट तयार होतात. भारत-पाकिस्तान करा-रांत बोलपटांचा समावेश करण्यांत आला नसल्यानें पाकिस्तान सरकार त्यांची आयात बेकायदा धरतें.

### इस्लामी आंतरराष्ट्रीय बँक

एक इस्लामी आंतरराष्ट्रीय बँक स्थापन करण्याच्या वाटाघाटी-साठीं इजिप्तच्या राष्ट्रीय बँकेचे गव्हर्नर कराची येथें गेले आहेत. स्टर्लिंग गटाचे संबंधांत बँक ऑफ इंग्लंडचें जें स्थान आहे, तेंच ह्या बँकेचें इस्लामी राष्ट्रांच्या गटाबाबत राहील.

## पंजाब राज्यांतील ग्रामोद्योग

पंजाब-राज्यांत गेल्या ४॥ वर्षांत ग्रामोद्योगाचे बरेच जुने धंदे नव्याने चालू करण्यांत आले आहेत, त्याचप्रमाणें कांहीं धंदे अगदीं नवीनहि काढण्यांत आले आहेत. हातमागाचा व्यवसाय हा पंजाबच्या व्यवसायांपैकीं एक जुना धंदा आहे. ह्या धंद्यांत सुमारें ५६,००० लोक पूर्ण वेळ काम करणारे आणि १०,००० लोक मधून मधून काम करणारे असे आहेत. तथापि हा धंदा मागासलेल्या स्थितींत आहे. हातमाग-कामगारांना आधुनिक उत्पादन पद्धतींचें शिक्षण देण्यासाठी कांहीं प्रात्यक्षिक दाखविणारीं केंद्रें आणि औद्योगिक शाळा उघडण्यांत आल्या आहेत. धंद्याच्या मार्गांतील मुख्य अडचण सुताच्या पुरवठ्याची आहे. सर्व हातमागांना जेवढें सूत लागतें, त्याच्या २० ते ३० टक्के सुताचाच सध्या पुरवठा होत आहे. पंजाबांत हातमोजे, पायमोजे, गंजिफ्राक वगैरे तयार करणारे सुमारें १,००० कारखाने आहेत. त्यापैकीं ९०० ग्रामोद्योगाच्या धर्तीवर काम करीत आहेत. ह्या धंद्याला लागणारें लोकरीचें सूत आणि विणकामाच्या यंत्रांतील सुया ह्यांची आयात करावी लागते. ह्या धंद्याच्या प्रगतीच्या आड येणारी हीच मोठी बाब आहे.

धातुविषयक विविध प्रकारचें काम करणारे बरेच कारखाने पंजाबांत आहेत. ह्या कारखान्यांत घरांत लागणारीं भांडीं करण्याच्या साध्या कारखान्यापासून ते सायकलीचे सुटे भाग तयार करणाऱ्या सर्व प्रकारच्या कारखान्यांचा समावेश होतो. सायकलींचे सुटे भाग तयार करणारे सुमारें २०० कारखाने आहेत. ते सर्व मिळून दरवर्षी जवळ जवळ ७० लाख रुपये किंमतीचा माल तयार करतात. कोरिआंतील युद्ध सुरू झाल्यापासून लोखंड मिश्रित नसलेल्या धातूंच्या किंमती वाढल्या आणि त्या धातु दुर्मिळ झाल्या. त्यामुळें घरगुती भांडीं करणाऱ्या धंद्याची परिस्थिति बिघडली आहे. लोखंड व पोलादाचीहि चणचण असल्यामळें त्यांच्या पुरवठ्यावर अवलंबून असणारे धंदेहिं आपल्या उत्पादनक्षमतेच्या ६० टक्केच उत्पादन करीत आहेत. जालंदर आणि बटाला ह्या दोन ठिकाणीं खेळण्याचें साहित्य तयार करण्याचे कारखाने केंद्रित झाले आहेत. अशा प्रकारचे कारखाने सुमारें १०० असून त्यांच्या वार्षिक उत्पादनाची किंमत सरासरी ७० लाख रुपये भरते. पंजाबांत तेलाच्या घाण्याचाहि धंदा आहे. राज्यांत सर्व मिळून ५ ते ६ हजार घाण्या असाव्यात असा अंदाज आहे. त्या सर्व मिळून दरवर्षी ५ ते ६ लाख मण तेल गाळीत असाव्यात. तेलबियांचा पुरवठा अपुरा असल्यामुळें ह्या धंद्यांतील एक तृतियांश उत्पादन-क्षमता वापरली जात नाहीं. पंजाबांत दरवर्षी सुमारें २२ लाख मण तेलबियांचें उत्पादन होतें.

हस्तीदंताचें कोरीव काम, लांकडाचें काम, धातूवरील नक्षीचें काम व लाखेचें काम इत्यादि कलाकौशल्याचीं कामें पूर्वी पंजाबांत होत असत. परंतु तीं करणारे मुसलमान परागंदा झाल्यामुळें ते धंदे जवळ जवळ नाहींसे झाले आहेत. त्यांच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न यशस्वी होत आहेत. गेल्या १८ महिन्यांत पंजाबांत प्लॅस्टिकचा धंदा बराच वाढला आणि त्याला मंदीहि आली. ह्या धंद्यासाठी लागणारी पावडर कोरियन युद्ध सुरू झाल्यापासून मिळेनाशी झाली. त्यामुळ प्लॅस्टिकच्या वस्तू करणार सुमारें ७५ कारखाने जवळ जवळ बंदच पडले आहेत. फाळणी झाल्यापासून कातड्याचा धंदाहि बसल्यासारखा झाला आहे.


# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

★

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर



# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५: } ११५।११६ भवानी पेठ, गूळ, आळी, पुणें २.

### भारत इंडस्ट्रिअल बँक लि.

वरील बँकेस १९५१ सालीं ३५,६८८ रु. नफा झाला. मागील शिल्लक नफा त्यांत मिळविल्यावर नफा वाटणीस ३६,१४५ रु. येतात. रिझर्व्ह फंडांत १०,००० रु. टाकावे, इनव्हेस्टमेंट डे. फंडांत २,००० रु. घालावे, ११,००० रु. ची कराची तरतूद करावी व ३% करमाफ डिव्हिडंडसाठीं २१,२५७ रु. खर्च करावे, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड आतां ७५,५०० रु. होईल. वसूल भांडवल ४,००,००५ रु. आहे. बँकेची प्रगति व नफ्याचें प्रमाण कायम आहे. ( चेअरमन श्री. वी. वाळवेकर मॅ. डायरेक्टर्स: एन. एन. क्षीरसागर, आर. बी. साळवेकर )

### किर्लोस्कर कारखान्यांना भेट

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. चे श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांच्या निमंत्रणावरून साउथ इंडियन पेटर एंजिन डीलर्स असोसिएशनचे सभासद, मेसर्स पॅरी अँड कंपनीचे श्री. व्ही. रंगस्वामी ह्यांचे समवेत सर्व किर्लोस्कर कारखान्यांना भेट देण्यासाठीं १० फेब्रुवारी रोजीं मद्रासहून निघाले. पुणें येथील किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. चा कारखाना, किर्लोस्करवाडी येथील किर्लोस्कर बंधू लि. चा कारखाना, हरिहर येथील म्हैसूर किर्लोस्कर मशीन टूल फॅक्टरी व बंगलोर येथील किर्लोस्कर इलेक्ट्रिक फॅक्टरी ह्यांस भेट देऊन ही मंडळी १७ फेब्रुवारी रोजीं मद्रासला परत पोंचली.

### भारतांत सुट्टी, इंग्लंडमध्यें कामांत खंड नाहीं

भारतांत शुक्रवारीं सरकारी कचेऱ्यांना अर्धा दिवस व बँकांना सबंध दिवस सुट्टी देण्यांत आली होती. पण, प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें फक्त दोन मिनिटें स्तब्धता राखण्यांत आली; बाकीचा सर्व वेळ नित्याचीं कामें चालू होतीं.

### श्री. खंडागळे ह्यांस निरोप व अल्पोपहार

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या पनवेल शाखेचे एजंट आणि इन्स्पेक्टर श्री. सं. म. खंडागळे यांची पनवेलहून कोरेगांव येथें बदली झाली आहे. पनवेल शाखेस संलग्न असलेल्या सहकारी सोसायट्या आणि पनवेल व पेण तालुका सहकारी खरेदी-विक्री युनियनस् यांच्यातर्फे त्यांना निरोप आणि अल्पोपहार देण्यांत आले. श्री. खंडागळे यांचे जागीं बँकेच्या हेड-ऑफिसमधून श्री. पैठणकर आले आहेत.

### ड्यूक ऑफ विंडसर

ड्यूक ऑफ विंडसर ह्यांनीं ११ महिने राज्य करून ११ डिसेंबर, १९३६ रोजीं राज्यत्याग केला. त्यांनीं सहाव्या जॉर्जच्या शुक्रवारच्या प्रेतयात्रेंत भाग घेतला. स्वतःच्या मागून गादीवर येणाऱ्या राजाच्या प्रेतयात्रेंत भाग घेणारे ड्यूक ऑफ विंडसर हे इंग्रजांच्या इतिहासांतील पहिलेच निवृत्त राजे होत.


**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कं. लि.**

हेड ऑफिसः—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.

**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**

**( शिड्यूल्ड बँक )**

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

**पुणें २.**

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५

खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.